# १०० कोटीचा समाज निर्मिती
# दायक जनरल फंड उभा करणार (मास्टर प्लॅन )

**(अ)**

१) निष्ठावान बौध्द उपासक, उपासिकांनी समाजाकरीता, धम्माकरीता दान देण्याची सवय लावावी.

२) प्रत्यक दिवशी सकाळी उठल्याबरोबर माझ्या मनात धम्मासाठी काही तरी दान देण्याचा विचार आलाच पाहिजे. मला नियमितपणे, निरंतर माझ्या समाजाच्या कल्याणाकरीता, मानव कल्याणाकरीता माझ्या शक्तिसामर्थ्याप्रमाणे काही तरी दान देणे आहे. काही तरी त्याग करणे आहे. माझ्या हाताला दान देण्याची सवय लागु दे ! निसर्गाचे, धम्माचे उपकार मानून, धम्माचे स्मरण करून नियमितपणे दरदिवशी मला काहातरी देणे आहे असा संकल्प करून बुध्दिमान व्यक्तीने दान देण्याचा अभ्यास करावा. बुध्दाने सांगितलेल्या दान पारमितेचा प्रत्येक्ष अभ्यास करावा. दान दिल्याने दान देणाऱ्या व्यक्तीला दृश्य- अदृश्य रूपाने अनेक फायदे होत असतात, मोठा लाभ होत असतो त्यासाठी..........

**आदर्श बौध्द कुटूंब कसे घडवावे ?**
**हे पुस्तक वाचा, लेखक डॉ.भदंत राहुल बोधी**

३) दायक सभासदांनी धम्माचे व समाजाचे आणि बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या महान कार्याचे व त्यागी जीवनाचे स्मरण करून दर दिवशी रूपये -१०, रूपये -५, रूपये- २ देण्याचा संकल्प करावा.
**प्रतिदिन १०×३६५ = ३६५०/-**
**ढोबळ मानाने रू.४००० वर्षभराचे दिले पाहिजे.**

४) पैसे चेक व्दारेच द्यावे व पावती घ्यावी.

५) कमीत कमी एक लक्ष दायक सभासद गोळा केले पाहिजेत. पैसे वर्षभराचे एक रकमीच घ्यावे किंवा फारच अशक्य असेल तर दोन हप्त्यांमध्ये पुर्ण पैसे घेतले जावे.

६) दायक सभासदांकडून फार्म भरून पैसे घेणे आणि सर्व छापील फार्मचा हिशेब ठेवणे तसेच सर्व सभासदांच्या फार्मरचा कॉम्पूटरवर डेटा ठेवणे आणि फाईल मध्ये सुध्दा फार्म जपून ठेवावे.

७) दर दिवशी १० रूपयाचा संकल्प करावा असे लोकांना सांगितले जावे. तसेच व्यवस्थापन खर्च एक रूपया समजून प्रति व्यक्ति १०+१=११ रूपये घेतले जावे, म्हणजे ११×३६५=४०१५ रूपये होतात, ठोबळ मानाने प्रति सभासद रूपये ४०००/- घेतले जावे.
म्हणजे ४०००×१०००००=४०,००,००,०००/- वर्षभराचे ४० कोटी होतात.

८) काही सभासदांकडून प्रतिदिन केवळ रूपये ५ किंवा गरीब व्यक्तींना रूपये २ किंवा रूपया १ सुध्दा देता येईल. फॉर्ममध्ये तशीही तरतूद करावी.

९) ९ किंवा ११ लोकांचे एक केन्द्रीय मंडळ निर्माण करावे. प्रयोग म्हणून ही केन्द्रीय कमिटी प्रथम १ वर्षा करीता निवडली जाईल. योग्य वाटल्यास पून्हा त्या कमिटीस वर्ष भराची वाढ देता येईल.

१०) सार्वजनिक निधी सांभाळणारी केन्द्रीय कमिटी १०० रूपयांचा फॉर्म भरून सभासद झालेल्या लोकांमधून निवडणुक पध्दतीने निवडली जाईल आणि तिथेच निकाल सांगीतला जाईल

११) निवडून आलेल्या उमेदवाराचे पदाचे वाटप त्याच मिटींगमध्ये किंवा दुसऱ्या वेगळया मिटींगमध्ये, परिस्थितीनुसार, केले जाईल.

**१२)** साधारणपणे खालील प्रमाणे पदे दिली जातील.

| | | |
|---|---|---|
| १) | केंद्रीय अध्यक्ष | -१ पद |
| २) | उपाध्यक्ष | - २ पदे |
| ३) | सेक्रेटरी जनरल | - १ पद |
| ४) | असिस्टन्ट सेक्रेटरी | - २ पदे |
| ५) | कोषाध्यक्ष | - १ पदे |
| ६) | सहकोषाध्यक्ष | - २ पदे |
| ७) | हिशेब तपासनीस | - १ पद |
| ८) | कोआर्डिनेटर (समन्वयक) - १ पद - एकुण ११ पदे | |

**१३)** बॅक अकाउन्ट तीन लोकांच्या सहीने ऑपरेट केले जातील ट्रेझरर, केंद्रीय अध्यक्ष आणि कोऑर्डीनेटर हया तिघांच्या सहयांनी बॅकेतील पैसे काढता येतील

**१४)** इतर सर्व पदाधिकाऱ्याचे नियम, सर्व साधारण संस्थेच्या निती-नियमाप्रमाणे असतील ते विस्तृतपणे लिहीले जातील.

**१५)** मुंबई शहरामध्ये सार्वजनिक फंडाच्या कामकाजासाठी एक केंद्रीय ऑफिस उघडले जाईल. त्यामध्ये आधुनिक पध्दतीने व्यवस्थापना करीता, कार्यभार वाटले जातीला. योग्य व्यवस्थापना साठी मानधन देऊन गरजे प्रमाणे योग्य कर्मचारी (ऑफिस स्टॉफ ) निवडले जातील.

**१६)** संस्थेत काम करणाऱ्याला मानधन किंवा वेतन तसेच योग्य निर्णय घेवून भत्ता वगैरे दिला जाईल.

**१७)** ही संपूर्ण योजना राबविण्यासाठी अंदाजे ४०० विभागीय प्रतिनिधी फंड जमा करण्यासाठी व संस्थेच्या विविध कार्यासाठी निवडले जातील. हया ४०० प्रतिनिधींना दरमहा मानधन रूपये ६००० हजारापर्यंत दिले जातील.

६०००×४००=२४,००,०००/-
एका महिन्या करीता रूपये २४,००,०००/-
तर १२ महीने करीता २४,००,०००×१२=२,८८,००,०००/-
४०० विभागीय प्रतिनिधींना १ वर्षाचे मानधन होईल २ कोटी ८८ लक्ष.

**१८)** पूर्ण वेळ काम करणारा एक ऑफिस मॅनेजर ठेवावा. दोन कॉम्पुटर ऑपरेटर ठेवावे, आणि १ ऑफीस असिस्टंट ठेवावा.

| | |
|---|---|
| मॅनेजर मानधन - दर महा | - १०,०००/- |
| कॉम्पुटर ऑपरेटर दर महा | - ८,०००/- |
| ऑफीस असिस्टंट दर महा | - ७,०००/- |
| कॉम्पुटर ऑपरेटर दर महा | - ८,०००/- |

तर कमीतकमी चारलोकांचे दरमहा मानधन होईल
१०,०००+८०००+७०००+८०००=३३,०००/-
एक वर्षाचे मानधन होईल ३,९६,०००/-

**१९)** फर्निचर, टेबल, खुर्च्या, कपाट, कॉम्पुटर, स्टेशनरी करीता अंदाजे रू-३,००,०००/-

**२०)** फॉर्म, हॅंडबिल्स् , पोस्टर किरकोळ सामाना करीता वर्षभराचे रूपये - ५,००,०००/-

**२१)** अंदाजे एकंदर खर्च येईल
प्रतिनिधी मानधन - २,८८,००,०००/-
ऑफिस व्यवस्थापन खर्च - ३,९६,०००/-
कॉम्पुटर, फर्निचर, खुर्च्या - ३,००,०००
पोस्टर, हॅंडविल्स, फॉर्म - ५,००,०००/-
एकुण खर्च ऑफिस करीता -२,९९,९६,०००/-

**२२)** मिटींग, सभा, संम्मेलने खर्च अंदाजे ५०,००,०००/- एक वर्षा करीता अंदाजे ५०,००,०००/-
एकुण अंदाजे खर्च

  २,९९,९६,०००/-
\+  ५०,००,०००/-

---

  ३,४९,९६,०००/-

अंदाजे ३ कोटी ५० लाख येईल..

ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यासाठी ऑफिस व्यवस्थापनाचा एकंदर खर्च होईल अंदाजे रूपये ३ कोटी ५० लाख.

---

# या महत्त्वाकांक्षी योजनेचा सामाजिक कल्याणासाठी कसा लाभ होईल ?

१) **कर्मचारी वर्ग :-** विभागीय ४०० प्रतिनिधी आपण मानधन देऊन निवडणार आहोत. अशा ४०० सुशिक्षित तरूणांना कामधंदा देण्यास फंडाची मदत होईल. असे निष्ठावान तरूण सामाजिक आणि धार्मिक कार्यासाठी कॅडरसारखे तयार होतील आणि चांगल्या कार्याला समर्पित लोकांचे मनुष्य बळ लाभेल. यासाठी २ कोटी ८८ लाख रूपये खर्च केले जातील.

२) **श्रामणेर / भिक्खुंना विदेशात पाठविण्याची प्रशिक्षण कमिटी :-** ४० ते ५० श्रामणेर भिक्खुंची बॅच केवळ ६ -६ महिन्यांकरीता धम्माच्या योग्य आणि उच्च प्रशिक्षणा करीता कोलंबो (श्रीलंका) येथे पाठविण्यात येणार आहेत. असे प्रशिक्षणप्राप्त श्रामणेर / भिक्खुंच्या योग्य समाज जडण - घडणासाठी मदत करता येईल.या साठी **रूपये १ कोटी ५० लाख** खर्च केले जातील.

३) **विद्यार्थ्यांना आर्थिक मदत कमिटी :-** समाजातील प्रतिभाशाली आणि मोठे ध्येय ठेऊन पुढे जाणाऱ्या काही होतकरू विद्यार्थ्यांची निवड करून त्यांच्या उच्च शिक्षणात जनरल फंडातून लाखोंची भरीव मदत करता येईल. वर्षाला **४ कोटी रूपये** त्यासाठी ठेवले जातील. होत करू विद्यार्थ्यांना काही अटी शर्थी वर मदत दिली जाईल.

४) **मोफत कोचींग कलासेस कमिटी :-** गरीब कुटूंबातील शाळेत, कॉलेजात शिक्षण घेत असलेल्या मुला-मुलींना मोफत कोचींग कलासेस मिळावे म्हणून काही तज्ञ लोकांना निवडून अनेक जिल्हयात उत्तम दर्जाचे कोचींग कलासेस सुरू करून हजारों विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल. त्यासाठी रूपये **२ कोटी खर्च** केले जातील.

५) **उपासक / उपासिकांना धम्म प्रशिक्षण कमिटी :-** आपले उध्दारक प.पू.बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठया दुर दृष्टीने जगातील महान धम्म आपणास दिला आणि **''मला सारा भारत बौध्दमय करावयाचा आहे''** असा संकल्प केला त्या महापुरूषाचे संकल्प धार्मिकरित्या पूर्ण करण्यासाठी शेकडो ठिकाणी उपासक उपासिकांसाठी दर आठवडयाला एक दिवस २ ते ३ तासाचे धम्म प्रशिक्षण वर्ग- सर्वत्र सुरू केले जातील. उत्तम तज्ञ शिक्षकांना निवडून त्यांच्या तर्फे योग्य धम्म प्रशिक्षण शिस्त बध्द रित्या दिले जाईल. धम्म प्रशिक्षक मानधनावर ठेवले जातील. त्यासाठी **३ कोटी रूपये** खर्च केले जातील.

६) **मुला - मुलींसाठी धम्म सन्डे स्कुल कमिटी :-** लहान मुलांना दर रविवारी शाळेला सुट्टी असते, लहानपणापासून धम्माचे योग्य प्रशिक्षण आपल्या प्रिय मुला-मुलींना मिळावे म्हणून वयोगट ६ ते १२ वर्षे वयाच्या मुला-मुलींना दर रविवारी केवळ १ ते दिड तासाकरीता धम्म प्रशिक्षण देण्यासाठी, सर्वत्र धम्म सन्डे स्कुल, गावा-गावांत, वार्डात-तालुका, जिल्हा स्थारावर उघडण्यात येतील आणि मुला मुलींना मोफत धम्म प्रशिक्षण दिले जाईल. लहान वयात फुलासारख्या सुंदर मुला बाळांना सत् धम्माचे सुसंस्कार दिले जातील. मोठी धार्मिक आणि शिलवान पिढी घडविली जाईल त्याकरीता **रूपये ३ कोटी खर्च** केले जातील.

७) **बुध्द विहारे बांधकाम अनुदान कमिटी :-**समाजामध्ये अनेक ठिकाणी बुध्द विहारे बांधली जात आहेत. अनेक ठिकाणची बुध्द विहारे पैस्या अभावी अनेक वर्षापासून अर्धवट पडून आहेत. अर्ध्यातूनच बांधकाम बंद पडले आहेत. अनेक बुध्द विहारे दुरूस्त करण्याच्या अवस्थेत आहेत परंतु पैशांअभावी

बांधकामे बंद पडली आहेत. अशा योग्य विहारांना निवडून, त्यांना आर्थिक मदत या फंडातून दिली जाईल. त्यासाठी **रूपये ४ कोटी खर्च** केले जातील.

८) **आजारी व्यक्तिंना मदत कमिटी :-** समाजातील काही लोक, मोठया कष्टाने जगत असतात, कधी त्यांच्या घरी कोणी आजारी पडले तर औषधोपचारासाठी पैसा नसतो. त्या गरीब मानसाला कोणी मदत करीत नाहीत. आजारात हाल अपेष्ठेत त्यांचे मुल्यवान जीवन संपूष्टात येते, कोणीही वेळेवर आर्थिक मदत करीत नाही अशा लोकांसाठी या फंडातून **१ कोटी रूपयांची** मदत शेकडो लोकांना केली जाईल. गरीबांना आधार बनेल

९) **मेडीकल चेकअप संयोजन कमिटी :-** अनेक ठिकाणी समाज सेवेच्या हेतूने वारंवार फ्री मेडीकल चेकअप आणि बिना मुल्य औषध वितरण कॅम्प लावले जातील. त्यासाठी रूपये **१ कोटी खर्च** केले जातील.

१०) समाज सेवेसाठी उत्कृष्ठ दर्जाच्या ५ ॲम्बुलन्स वेगवेगळ्या ठिकाणी ठेवल्या जातील त्याकरीता **रूपये ५० लख** खर्च केले जातील.

११) **धम्म पुस्तके प्रकाशन कमिटी :-** योग्य धम्म प्रचार - प्रसाराकरीता धम्म साहित्य स्वरूपात लहान लहान पुस्तिका छापल्या जातील आणि बिना मूल्य फ्री वाटल्या जातील त्यासाठी **रूपये २ कोटी** खर्च केले जाईल.

१२) **निबंध स्पर्धा कमिटी :-**बाबासाहेबांनी लिहीलेला भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, तसेच बौध्द त्रिपीठक, मिलींद प्रश्न इत्यादी धम्मग्रंथावर सर्वत्र निबंध स्पर्धा आयोजित करून स्पर्धकांना आकर्षक असे मोठ-मोठे बक्षीसे देऊन धम्म अभ्यास करण्याची त्यांना चालना मिळावी, बौध्द तत्वज्ञाना बद्दल, बौध्दांनी आणि इतर धर्मियांनी अभ्यास करावा म्हणून मोठे बक्षीसे देऊन जिल्हयाच्या आणि राज्य स्थारावर निबंध स्पर्धा आयोजित केल्या जातील त्यासाठी **१ कोटी रूपये** खर्च केले जातील.

१३) **अन्याय निवारण मदत कमिटी :-** वेगवेगळया तालुक्यात आणि जिल्हयात समाजावर अनेक वेळा सामाजिक अन्याय अत्याचार केला जातो. अत्याचाराला बळी पडलेल्या लोकांना कोणी आर्थिक मदत करीत नाही. कधी - कधी त्यांना योग्य न्याय मिळत नाही. न्याय मिळविण्यासाठी कोर्ट कचेरीत जाण्यासाठी वकील पाहीजे, चांगल्या वकीलासाठी पैसा लागतो, तो पैसा बऱ्याच लोकांकडे उपलब्ध नसतो आणि अनेक बंधु-भगींनी अन्यायाला बळी पडत असतात. त्यांना आधार देण्यासाठी, सामाजिक न्याय मिळविण्यासाठी या फंडातून लोकांना मदत केली जाईल, त्यासाठी किमान **रूपये २ कोटी खर्च** केले जातील.

१४) **घोषवाक्य नोट बुक छापई कमिटी :-** तथागत भगवान बुध्दाचे आणि बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे प्रेरणादायक घोष वाक्य असलेल्या स्पेशल वहया किंवा नोटबुका छापल्या जातील आणि शाळेत जाणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना असे नोटबुक किंवा वहया वाटल्या जातील. नोटबुकावरील वाक्ये विद्यार्थ्यांना निरंतर प्रेरणा देत राहील. त्यांचा लाभ होईल त्यासाठी हया फंडातून **रूपये १ कोटी खर्च** केले जातील.

१५) **भिक्खु प्रशिक्षण अनुदान कमिटी :-** बौध्द धम्म प्रशिक्षणावर आधारलेला आहे. आपल्या श्रामणेर भिक्खुंचे सुध्दा योग्य प्रशिक्षण झाले पाहीजे. त्यांना शिस्तबध्दरित्या धम्म शिकविला पाहीजे, विदेशी बौध्द संघाप्रमाणे त्यांना शिकवून, बौध्द धम्मावर त्यांच्या परीक्षा घेतल्या जाव्या. प्रथम योग्य प्रकारे शिकविले जावे. धम्म अभ्यासाच्या सोयी - सुविधा त्यांना पूरविल्या जाव्या, त्यांची योग्य देख रेख

ठेवली जावी, योग्य काळजी घेतली जावी. ज्यामुळे चांगले सुशिक्षित आणि प्रशिक्षित धम्मगुरू बौध्द समाजाला मोठया संख्येनी लाभतील. म्हणून जिथे - जिथे भिक्खु संघ वास्तव्य करतो आणि जेथे वेळो वेळी योग्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात अशा विहारांची निवड करून या फंडातून **रूपये २ कोटी** चे अनुदान अनेक बुध्द विहारांना दिले जाईल.

१६) ऐतिहासिक बौध्द स्थळांच्या दर्शना करीता वारंवार धम्म सहली काढल्या गेल्या पाहिजे जे अशा धम्म सहली काढीत असतात त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे, कमीत कमी खर्चात अशा धम्म सहली देशात आणि विदेशात काढल्या जातील, त्या दिशेनी प्रयत्न केले जातील.

१७) **उच्चशिक्षण आणि तांत्रीक एज्युकेशन कौऊन्सलिंग कमिटी :-** देशातील आय.ए.एस.यु.पी.एस. आय पी.एस. एम.पी.एस. अशा परिक्षेला विद्यार्थ्यांनी बसावे, मोठे अधिकारी होण्याचे ध्येय ठेवावे. त्या दिशेनी विद्यार्थ्यांना प्रेरीत करणे, तसे मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे, विद्यार्थी करिअर मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे, समाजाला सबळ सुशिक्षित समाज घडविणे त्या दिशेनी योजना आखल्या जातील. वारंवार एज्युकेशन कौऊन्सलिंग शिबिरे वेगवेगळया ठिकाणी आयोजित केले जातील व त्यांना उचित मार्गदर्शन दिले जाईल त्यासाठी हया फंडातून **रूपये १ कोटी ५० लाख** खर्च केले जातील.

१८) समाजोत्थानाच्या गरजे नुसार वेगवेगळया नवनविन योजना जनहिता करीता राबविल्या जातील. कोणत्याही योजनेचे पैसे काळावेळा प्रमाणे, व गरजे प्रमाणे कमी-जास्त करण्याचे अधिकार केन्द्रीय कमिटीला असतील.

१९) प्रत्येक योजना राबविण्यासाठी त्या - त्या क्षेत्रातील वेगवेगळया कमिटया सेवा भावनेनी गरजे प्रमाणे निर्माण केल्या जातील आणि त्या क्षेत्रातील तज्ञ कमीटीच्या मार्गदर्शनाने आणि शिफारशीने त्या-त्या योजनेसाठी केन्द्रीय कमीटी कडून फंड दिला जाईल. प्रत्येक महत्व पूर्ण योजना राबविण्यासाठी त्या-त्या क्षेत्रातील तज्ञांची विशेष कमीटी निर्माण केली जाईल. ती विशेष कमीटी त्या योजनेचा आणि त्या क्षेत्राचा सर्वे करेल, अभ्यास करील आणि आर्थिक मदतीची लेखी शिफारीस केन्द्रीय कमीटीला करील त्यानंतर पैसे देण्याचा योग्य निर्णय घेतला जाईल व त्या क्षेत्रातील ती योजना राबविली जाईल.

२०) सामुदायिक इच्छा शक्तिने आणि सामुदायिक प्रयत्नाने आपण वैज्ञानिकपणे आपल्या समाजाचा मोठा विकास करू शकतो. आपल्या मध्ये विद्यमान असलेल्या शक्तिचा योग्य उपयोग करून आपण समाजाला सामुदायिक विकासाच्या दिशेनी घेऊन जावु शकतो. त्यासाठी हा सेवाभावी विनम्र प्रयत्न आहे. समाजातील सुशिक्षित, जागृत आणि सामाजिक बांधीलकी मानणाऱ्या निष्ठावान सभ्य लोकांनी या अभिनव योजनेत सामील व्हावे आणि आपले मोठयात - मोठे योगदान द्यावे ही विनंती.

२१) लोक हितासाठी, जनकल्याणासाठी दान देणे हे कुशल कार्य आहे, बुध्दाने सांगीतल्या प्रमाणे दान पारमिताचे पालण करणे, स्वतःच्या हाताला दान देण्याची सवय लावणे, हे मोठे कुशल कार्य आहे. त्याचा अवलंब प्रत्यक व्यक्तिच्या जीवनात झाला पाहीजे. आता आपले हात दान देणारे घडू दे. मागण्यासाठी हात पसरविण्या पेक्षा आता आपले हात, आणि आमच्या मुला-बाळांचे हात, सढळ हाताने दान देणारे बनु दे । मी माझ्या शारिरीक आणि बौध्दिक शक्ती सामर्थ्याने जे काही धन द्रव्य मिळवित असतो, त्या माझ्या निढळ मिळकतीचा काही हिस्सा सत्धम्माला आणि समाजाला जावु दे ! माझे पवित्र जीवन केवळ माझ्या मुला बाळांसाठीच, केवळ माझ्या कुटूंबियासाठीच कमविणारे ठरू नये, तर माझ्या समाजासाठी सुधा मी मिळविणारा ठरू दे ! माझ्या मिळकतीतून समाजासाठी सुध्दा मला देणे आहे. पे

बॅक टु सोसायटीचे घोष वाक्य नेहमी मनात ठेऊन मला त्या दिशेने प्रत्यक्ष वाटचाल करायची आहे. असा कल्याणकारी मंगल संकल्प आपल्या प्रत्यक बंधु-भगीनीच्या मनात निर्माण झाला पाहिजे. आणि आपण स्वइच्छेनी स्वप्रेरणेनी पुढे येवुन, तसेच आपल्या अनेक नातेवाईकांना आणि दोस्त मित्रांना दान देण्यास नेहमी प्रेरीत केले पाहीजे . समाजाचे फार कल्याण होईल ! सर्वांचे मंगल होवो !

२२) **इलेक्ट्रानिक पध्दतीने पारदर्शक हिशेब ठेवला जाईल :** सामाजिक सार्वजनिक फंडाची सुरक्षा मोठया पारदर्शक पध्दतीने कॉम्पुटर वर ठेवली जाईल. वेळो वेळी वेब साईट वर माहीती दिली जाईल. किती दायक सभासद जमा झाले ? किती निधी जमा झाला ? कोण - कोणत्या हेडींग वर किती निधी खर्च झाला ? कोण - कोणत्या कमिटया आहेत ? कोणत्या कमिटीत कोण-कोण आहेत ? निधी कसा जमा होतो आहे ? खर्च कसा होतो आहे ? इत्यादी माहीती वेब साईट वर वारंवार दिली जाईल. आधुनिक तंत्र ज्ञानाचा वापर करून ईमेल, आणि वेब साईट द्वारे प्रत्येकांना आप आपल्या मोबाईल वर किंवा कॉम्प्युटर वर सर्व प्रोजेक्टची प्रगती इ. सर्व काही पहाता येईल. त्याग आणि समाज सेवा भावनेनी प्रत्येकांनी पुढे आले पाहीजे. मला समाजाला काहीतरी देणे आहे ही देण्याची भावना मनात ठेवून या योजनेला राबविले जाणार आहे.

**धम्माच्या विनम्र सेवेत,**
**पूज्य भदंत डॉ. राहुल बोधी, महाथेरो**
**बी.कॉम. एम.ए.पी.एच.डी. विपश्यनाचार्य.**